पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

दिनांक :०७/०३/२०२०

# आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधुन गडचिरोली पोलीस दलाने सुरु केले "ऑपरेशन रोशनी"

## ❖ महिला दिनाच्या पुर्वसंध्येला ५ महिलांवर मोतिबिंदु शस्त्रक्रिया यशस्वी.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या संकल्पनेतुन गडचिरोली जिल्हा पोलीस दलाने गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील नागरिकांसाठी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधुन "ऑपरेशन रोशनी" उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार असुन आवश्यक रुग्णांना मोफत औषधोपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

या उपक्रमाला आज मा. पोलीस अधीक्षकांच्या उपस्थितीत सुरवात करण्यात आली. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पुर्वसंध्येला दुर्गम भागातील ०५ महिला व ०६ पुरुष असे एकुण ११ जणांवर "ऑपरेशन रोशनी" अंतर्गत मोफत मोतिबिंदु शस्त्रक्रिया करुन त्यांच्या जीवनातला अंध:कार दुर करण्यात आला. मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी यशस्वी शस्त्रक्रियेनंतर सर्व रुग्णांशी संवाद साधुन त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या यावेळी रुग्णांनी व रुग्णांच्या नातेवाईकांनी आंतरराष्ट्रीय महिला दिना निमीत्ताने गडचिरोली पोलीस दलाने सुरु केलेल्या या अभिनव उपक्रमाचे स्वागत करुन गडचिरोली पोलीस दलाचे आभार मानले.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी सदर उपक्रम मोठया प्रमाणात सुरु करण्याचे संकेत देतानाच जिल्हाभरातील गरजु नागरिकांना "ऑपरेशन

रोशनी” उपक्रमात सहभागी होवुन “ऑपरेशन रोशनी” उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.




